सं.फौ.ख.क्र.१८४/२०२१
सरकार वि.लोकेश
नि.क्र.९ च्या खाली

साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रविण प्रभाकर मुळे,
वय २९ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.चनोडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

१. घटनेची तारिख मला आठवत नाही परंतु घटनेच्या दिवशी मी घरी असतांना मला अपघात झाल्याबाबत फोन आला होता. त्यानंतर मी घटनास्थळावर गेलो असता त्याठिकाणी घटनास्थळावर काहीही नव्हते.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८/१२/२०२० रोजी मला आरोपी लोकेश याच्या ॲटोचा अपघात झाल्याबाबत फोन आला होता व त्यानंतर मी घटनास्थळावर गेलो व बघितले असता ॲटोच्या खाली खुशाल कळसकर यांची पत्नी दबुन मयत झाली होती व अंकिता, प्रशांत मुळे व त्यांची पत्नी यांनासुध्दा मार लागलेला होता. हे मला माहित नाही की, सदरचा अपघात हा आरोपी लोकेश याच्या चुकीमुळे झालेला होता. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. एस.एस. धोटे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१०.१२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड